# पो.स्टे. वर्धा शहर चैन स्नॅचींगच्या आरोपीला रंगेहात अटक

हकीकत या प्रमाणे आहे की, दिनांक 31.03.2019 रोजी 20.00 वा. दरम्यान फिर्यादी कू. तृप्ती बनारसे, रा. प्रतापनगर, वर्धा ही आपले आई सोबत गोलबाजार वर्धा येथे भाजी विकत घेण्याकरिता गेली असता व भाजीच्या दूकानांसमोर आपले मोपेडवर बसली असता अज्ञात आरोपी हा पायदळ पायदळ तिचे समोर आला व तीच्या गळयातील एक सोन्याची चैन ज्यामधे बादाम आकाराचे लॉकेट होते असे, वजन अंदाजे 5.9 ग्रॅम कि. 18,000/- रू चे तिचे गळयातून जबरीने हीसकावून तोडून चोरून नेले फिर्यादीचे रिपोर्टवरून आरोपीविरूध्द पो.स्टे. वर्धा शहर येथे अप.क्र. 444/2019 कलम 392 भादविचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

त्या दरम्यान स्था.गु.शा. येथील पथक महत्वाचे व्यक्तींचे सभा बंदोबस्त संबंधाने पेट्रोलींग करीत असता त्यांना भाजी मार्केट चैकातून एक इसम धावत येतांना दिसला व त्याच्या मागे इतर इसम धावत होते. संशयावरून त्याचा पाठलाग करून शिताफीने सदर इसमास ताब्यात घेवून माहिती प्राप्त करून विचारपूस केली असता सदर इसम नामे अर्जून अशोक लोंढे, वय 26 वर्षे, रा. अशोकनगर, वर्धा याने हिचे गळयातून तिची सोन्याची चैन व लॉकेट जबरीने ओढली व पळत असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे अंगझडती दरम्यान त्याचेकडून सदर लॉकेट व चैन किं. 18,000/-रू ची जप्त करण्यात आली व आरोपीस पो.स्टे. वर्धा शहर येथे दाखल करण्यात आले.

सदर कारवाई मा. पोलीस अधिक्षक डॉ. श्री. बसवराज तेली, व मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. निखील पिंगळे, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. निलेश ब्राम्हणे, स्थानिक गुन्हे शाखा, वर्धा यांचे निर्देशांप्रमाणे पो.हवा. निरंजन वरभे, ना.पो.शि. रितेश शर्मा, विकास अवचट, संघसेन कांबळे, पो.शि. राकेश आष्टनकर यांनी केली.